क्र.२/नसा/महासभा/०५/२०१६-२०१७
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक - २७ ऑक्टोबर २०१६

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०५ /२०१६-२०१७

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १५/१०/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे

7.10.16
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

मागील सर्वसाधारण सभा दि.०१.०१.२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दुःखद घटनांचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेमधील अनाधिकृत असलेल्या १९ प्रस्तावांच नियमितीकरणासाठी व एक धार्मिक स्थळाचे स्थलांतर करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०७/२०१६ चे विषयपत्र.**

५. महापालिका क्षेत्रातील दुचाकी व चारचाकी गाड्यांना LBT आकारणीबाबत मा.महासभा ठराव क्र.२० दि.२०/०४/२०१६ अन्वये पारित करणेत आलेल्या ठरावानुसार प्रशासनाने या संदर्भात सादर केलेला अहवाल अवलोकनी घेणेकामी **उपायुक्त (स्थानिक संस्था कर) यांचे दि.१०/०८/२०१६ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२१ मधील धनगर गल्ली येथील अथर्व अपार्टमेंट समोरील चौकास दुर्गामाता चौक असे नामकरण करणेकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सूचना व हरकती प्राप्त न झाल्याने, वॉर्ड क्र.२१ मधील धनगर गल्ली येथील अथर्व अपार्टमेंट समोरील चौकास दुर्गामाता चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०३/१०/२०१६ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील दर्गा कमान ते जवाहर चौक व भंडारीबाबा दर्गा ते बसवेश्वर चौक या मार्गावर येणाऱ्या मटण मार्केट जवळील चाकोस पूर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम चौक असे नामकरण करणेकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सूचना व हरकती प्राप्त न झाल्याने, मिरज येथील दर्गा कमान ते जवाहर चौक व भंडारीबाबा दर्गा ते बसवेश्वर चौक या मार्गावर येणाऱ्या मटण मार्केट जवळील चाकोस पूर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०९/२०१६ चे विषयपत्र.**

८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) अन्वये निवृत्त झालेल्या स्वाभिमानी विकास आघाडीच्या दोन स्थायी समिती सदस्यांच्या जागी नविन दोन सदस्यांचे मा.महापौरसो यांनी महासभा ठराव क्र.८६ अन्वये प्रलंबित ठेवलेला लिफाफा मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे रिट पिटीशन क्र.२०४८७/२०१६ चे निकालानुसार उघडणेस व नामनिर्देशनाने दोन सदस्य नियुक्त्ती करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.२९/०९/२०१६ चे विषयपत्र.**

९. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१०. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे

7-10-16

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०५/२०१६-१७

महापालिका सभा दिनांक १५/१०/२०१६ करीता.

शनिवार दि.१५/१०/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खालील नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.जगन्नाथ बापू ठोकळे आणि मा.सौ.शेवंताताई गोपाळ वाघमारे यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सि.स.नं.२६९/२ या जागेमध्ये तत्कालीन नगरपरिषदेने घरे बांधून ती घरे कायम स्वरुपी खुष खरेदीने संबंधीत नागरिकांना दिलेले आहेत. सदर ठिकाणी असणाऱ्या घर नंबर १ ते घर नंबर ३५ या मिळकती मध्ये गटारीच्या आतील बाजूस असणारी व सद्या वापरात असणारी १०X १३ ही जागा चालूबाजार भावाप्रमाणे मिळावी अशी मागणी या परिसरातील नागरीकांची अनेक वर्षापासून आहे. सदरचा प्रस्ताव स्विकारुन,आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन, प्रशासनाने प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेस निर्णय होणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.राजेश विठ्ठल नाईक यांनी दिलेला प्रस्ताव :-

मा.कै.वसंतदादा पाटील जन्मशताब्दी निमित्त मा.वसंतदादा स्मारक येथे विविध कार्यक्रमाचे नियोजन करणे, त्याठिकाणी समाधी स्थळाचे सुशोभिकरण करणे व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता देणेबाबत आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १३/१०/२०१६.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ९६

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.०१/०९/२०१६ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.७७ ते ठराव क्र. ९५ हे सभागृहामध्ये कार्यवृत्त वाचून कायम करीत असताना सभागृहातील उपस्थित सदस्यांनी ठराव क्र.९० दि.०१/०९/२०१६ अन्वये पारित करणेत आलेल्या कुपवाड स.नं.२९७/१ मधून ४.५०मी. व स.नं.३०५ मधून ४.५० मी. प्रस्तावित केला असून, कलम ३१ (१) नुसार उ.दं.९ मी.कायम झालेल्या रस्ताबाबत कलम ३७ अन्वये रस्त्याच्या फेरबदला बाबत एक महिन्याच्या मुदतीत सूचना व हरकती मागवून महासभेची अंतिम मान्यता घेवून मा.शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेत आली होती.

सदर ठरावाच्या अनुषंगाने दाखल झालेल्या मा.सौ.जरिना जमिल बागवान आणि मा.बसवेश्वर आनंदराव सातपुते यांच्या उपसूचना वगळणेत येवून, ठराव क्र.९० दि.०१/०९/२०१६ मधील उपसूचना वगळून मुळ प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करणेत यावी.

तसेच, ठराव क्र.९१ दि.०१/०९/२०१६ अन्वये पारित करणेत आलेला महापालिकेच्या ६ सेवानिवृत्त अभियंते यांना मा.शासन अधिसूचनेनुसार वेतन श्रेणी लागू करणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत आली होती. सदर ठरावाच्या अनुषंगाने दाखल झालेली मा.संतोष शिवदास पाटील यांची उपसूचना वगळणेत येवून, ठराव क्र.९१ दि.०१/०९/२०१६ मधील उपसूचना वगळून मुळ प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करणेत यावी.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उपसूचनांबाबत संबंधीत विभागाने म्हणजेच नगररचना विभागाने रितसर सूचना व हरकती मागवून, मा.शासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविणेस रितसर विषयपत्र सत्वर महासभेकडे मान्यतेसाठी सादर करणेस प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत असून, उर्वरित कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. संचालक नगररचनाकार

प्रशासन अधिकारी (आस्थापना)

महापालिका सचिव

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

उरी येथे दहशतवादयांच्या हल्ल्यामध्ये शहीद झालेले १९ भारतीय जवानांना वीर मरण आले. यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.गौतम संभाजी पवार ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री.प्रदिप जगोंडा पाटील यांचे वडील स्व.जगोंडा आण्णा पाटील यांचे दि.१३/०९/२०१६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

अनुमोदक :- मा.प्रशांत पायगोंडा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

विधान परिषद विरोधी पक्षनेते मा.धनंजय मुंढे यांचे वडील पंडीत आण्णा मुंढे यांचे दि.१३/१०/२०१६ रोजी निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :- मा.शेडजी सुबराव मोहिते महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १००

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

तत्कालीन नगरपरिषदेचे नगरसेवक कै.सुरेश रामचंद्र सलगर यांचे अल्पशः आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.संतोष शिवदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उपआयुक्त/सहा.आयुक्त

महापालिका सचिव,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

उरी येथील शहीदांचा बलीदानामुळे संपूर्ण भारतामध्ये संतापाचा लाट व तिव्र असंताष निर्माण झाला होता. जनता सरकार कडून बदला घेण्याच्या प्रतिक्षेत होती. मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून Surgical Strike करुन पाकिस्तानाला अद्दल घडवल्याबद्दल सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

अनुमोदक :- मा.युवराज सतिश बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

म.द.बर्वे प्राथमिक शाळा,सांगली या शाळेतील शिक्षक श्री.संजीव पांडूरंग चौगुले यांना कब-बुलबुल मधील उत्कृष्ठ कामगिरी करीता मा.राष्ट्रपती यांचे हस्ते दि.०५/०९/२०१६ रोजी राष्ट्रपती पुरस्कार देणेत आल्याबद्दल ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शेडजी सुबराव मोहिते महापौर.

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०३

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०७/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्र.८५१९/२००६ व मा.उच्च न्यायालय जनहित याचिका क्र.१०४/२०१० मधील निर्देशानुसार अनधिकृत धार्मिक स्थळांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत निश्चित केलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार सार्वजनिक /शासकीय जागेवरील अनधिकृत धार्मिक स्थळांची बांधकामे नियमित करणे,निष्कासीत करणे व स्थलांतरीत करणेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने मा.आयुक्तसो यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या बैठकीमध्ये झाले निर्णयानुसार महापालिका हद्दीतील प्रभाग निहाय सर्वेक्षण करणेत आले. त्यामध्ये एकूण १८० धार्मिक स्थळे आढळून आली आहेत. सदरच्या १८० धार्मिक स्थळांची यादी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करुन नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. तसेच, धार्मिक स्थळांचे संबंधीत व्यक्ती व संस्था यांना नोटीसा बजावून धार्मिक स्थळे नियमित करणेबाबत कळविणेत आलेनुसार महापालिका हद्दीतील ३९ धार्मिक स्थळांचे प्रस्ताव नियमाधीन करणेसाठी दाखल झालेले आहेत. दाखल झालेल्या एकूण प्रस्तावापैकी महापालिकेच्या जागेवरील मालकीच्या खुल्या जागा (ओपन स्पेस) मधील १९ प्रस्ताव आहेत. महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जागांवरील एकूण १९ खुल्या जागांपैकी ८ खुल्या जागांवर महापालिकेच्या नावाची नोंद आहे. तर उर्वरीत ११ खुल्या जागेवर महानगरपालिकेचे नाव नमुद नसल्याने, सदरच्या ११ खुल्या जागेवर महानगरपालिकेचे नाव नमुद करुन घेणे या सभेस उचित वाटते. त्यानुसार प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सबब, महानगरपालिकेच्या मालकीच्या विषयपत्रातील नमुद खुल्या जागांतील १९ प्रस्तावांचे नियमितीकरणासाठी व एक धार्मिक स्थळांचे रस्त्यावरुन लगत असलेल्या महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेत स्थलांतर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

सहा.संचालक नगररचनाकार

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०४

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (स्थानिक संस्था कर) यांचे दि.१०/०८/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील दुचाकी व चारचाकी गाड्यांना LBT आकारणीबाबत मा.महासभा ठराव क्र.२० दि.२०/०४/२०१६ अन्वये पारित करणेत आलेल्या ठरावानुसार प्रशासनाने या संदर्भात सादर केलेला अहवाल तुर्त प्रलंबित ठेवणेत येत आहे.

सूचक :

अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,

एल.बी.टी. अधिक्षक

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०३/१०/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२१ मधील धनगर गल्ली येथील अथर्व अपार्टमेंट समोरील चौकास दुर्गामाता चौक असे नामकरण करणेकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सूचना व हरकती प्राप्त न झाल्याने, वॉर्ड क्र.२१ मधील धनगर गल्ली येथील अथर्व अपार्टमेंट समोरील चौकास दुर्गामाता चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०८/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील दर्गा कमान ते जवाहर चौक व भंडारीबाबा दर्गा ते बसवेश्वर चौक या मार्गावर येणाऱ्या मटण मार्केट जवळील चाकौस पूर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम चौक असे नामकरण करणेकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सूचना व हरकती प्राप्त न झाल्याने, मिरज येथील दर्गा कमान ते जवाहर चौक व भंडारीबाबा दर्गा ते बसवेश्वर चौक या मार्गावर येणाऱ्या मटण मार्केट जवळील चाकौस पूर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :

अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०७

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.२९/०९/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) अन्वये दि.०१/०९/२०१६ रोजी दुपारी निवृत्त होणाऱ्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे ०३, नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पक्षाचे ०३ व स्वाभिमानी विकास आघाडी ०२ असे एकूण ०८ सदस्य सेवानिवृत्त झालेने त्यांचे जागी अधिनियमातील कलम २० (५) अन्वये तौलनीक संख्याबळानुसार नविन सदस्य स्थायी समितीवर नामनिर्देशित करणेबाबत दि.०१/०९/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केलेल्या महासभा क्र.०४ मधील विषय क्र.०४ अन्वये घेणेत आला होता. सदर सभेमध्ये मा.महापौरसाो यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे ०३, नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पक्षाचे ०३ सदस्यांची नावे सभागृहामध्ये घोषित केली व स्वाभिमानी विकास आघाडीचे सदस्य श्री.युवराज बावडेकर व कु.स्वरदा केळकर यांनी स्वाभिमानी विकास आघाडीची मान्यता राज्य निवडणूक आयोगाने रद्द केली असून, निवडणूक आयोगाचा अंतिम निर्णय येई पर्यंत स्वाभिमानी विकास आघाडीचे सदस्य निवडू नयेत दोन सदस्यांची नियुक्ती स्थगीत ठेवावी अशी मागणी केलेनुसार स्वाभिमानी विकास आघाडीचे ०२ सदस्यांचे नावाबाबत राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय होईपर्यंत दि.३०/०९/२०१६ पर्यंत सदस्यांची नावे घोषित करणेचे प्रलंबित ठेवून स्वाभिमानी विकास आघाडीच्या गटनेत्यांनी दिलेला लिफाफा उघडणेत आलेला नव्हता.

मा.महापौर यांच्या उपरोक्त निर्णय विरुद्ध स्वाभिमानी विकास आघाडीचे गटनेते श्री.शिवराज श्रीशैल्य बोळाज यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे सिव्हिल रिट पिटीशन नं.१०४८७/२०१६ अन्वये दाखल केलेली होती. सदर पिटीशनची सुनावणी होवून मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे रिट पिटीशन क्र.१०४८७/२०१६ चे निकालानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) अन्वये निवृत्त झालेल्या स्वाभिमानी विकास आघाडीच्या दोन स्थायी समिती सदस्यांच्या जागी नविन दोन सदस्यांचे मा.महापौरसाो यांनी महासभा ठराव क्र.८६ अन्वये नामनिर्देशनाद्वारे सहा सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत येवून प्रलंबित ठेवणेत आलेला स्वाभिमानी विकास आघाडीच्या गटनेत्यांनी दिलेला लिफाफा उघडून नामनिर्देशनाद्वारे घोषित केलेल्या खालील सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे

१) मा.बोळाज शिवराज श्रीशैल्य :- स्वाभिमानी विकास आघाडी

२) मा.पाटील सुनिता संजय :- स्वाभिमानी विकास आघाडी

वरील प्रमाणे नोंद घेवून योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (किशोर दादासो जमादार)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

अनुमोदक :- (प्रशांत प्रभाकर पाटील)

मा. लिपिक

5.10.2016

मुलिका सचिव

कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ५०८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये मा.जगन्नाथ बापू ठोकळे आणि मा.सौ.शेवंताताई गोपाळ वाघमारे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सि.स.नं.२६९/२ या जागेमध्ये तत्कालीन नगरपरिषदेने घरे बांधून ती घरे कायमं स्वरुपी खुष खरेदीने संबंधीत नागरिकांना दिलेले आहेत. सदर ठिकाणी असणाऱ्या घर नंबर १ ते घर नंबर ३५ या मिळकती मध्ये गटारीच्या आतील बाजूस असणारी व सद्या वापरात असणारी १०X १३ ही जागा चालूबाजार भावाप्रमाणे मिळावी अशी मागणी या परिसारातील नागरीकांची अनेक वर्षापासून आहे. सदरचा प्रस्ताव स्विकारुन, आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन, प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १०९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य राजेश विठ्ठल नाईक यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मा.कै.वसंतदादा पाटील. जन्मशताब्दी निमित्त मा.वसंतदादा स्मारक येथे विविध कार्यक्रमाचे नियोजन करणे, त्याठिकाणी समाधी स्थळाचे सुशोभिकरण करणे व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता देणेकामी प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ५१०

विषय क्रमांक :- ऐन.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५ (अ) अन्वये महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्य पार पाडणे या तरतुदीनुसार स्थायी समितीकडे प्रलंबित असणारे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२०/०९/२०१६ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातर्गत नागरी बेघरांसाठी रात्रनिवारे बांधणेसाठी सांगली येथील बस स्टॅन्ड जवळील पत्रकार नगर येथील महानगरपालिकेच्या मालकीची स.नं.५४७/१ प्लॉट नं.१३ या जागेमध्ये कंपाऊंडसह इमारत बांधकाम करणे एस्टीमेट र.रु.३८,९५,४३४/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त आठ निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक ए.आर.पाटील, सांगली यांचेकडून एस्टीमेट दराच्या १८.९०% कमी या दराने प्रस्तुतची कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- ऐन.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५ (अ) अन्वये महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्य पार पाडणे या तरतुदीनुसार स्थायी समितीकडे प्रलंबित असणारे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२०/०९/२०१६ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियांनातर्गत नागरी बेघरांसाठी रात्रनिवारे बांधणेसाठी सांगली विश्रामबाग रेल्वे स्टेशन जवळ स.नं.३८८५ या मनपाच्या जागेमध्ये इमारत बांधकाम करणे एस्टीमेट र.रु.७९,३६,२८१/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त पाच निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक ए.आर.पाटील, सांगली यांचेकडून एस्टीमेट दराच्या १८.९०% कमी या दराने प्रस्तुतची कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील समुद अर्थसकल्पीय तरतुदामधून होणेचा आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ५५२

विषय क्रमांक :- ऐन.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५ (अ) अन्वये महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्य पार पाडणे या तरतुदीनुसार स्थायी समितीकडे प्रलंबित असणारे उपायुक्त (मा.आ.क.सांमेली) यांचे दि.१४/०९/२०१६ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या बालवाड्यांमध्ये ७० बालवाडी सेविका कार्यरत आहेत. सदर बालवाड्या चालविणाऱ्या सेविकांना सद्या दरमहा रु.१०००/- इतके मानधन महापालिकेकडून आदा केले जाते. सद्या वाढती महागाई विचारात घेता, सदरचे मानधन हे अत्यंत अपुरे असल्याने सदर सेविकांना मानधन वाढ देणे उचित होणार आहे असे या सभेचे मत असून, सदर बालवाडी सेविकांना रु.१०००/- ऐवजी रु.३०००/- मात्र मानधन ठरावचे दिनांकापासून आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

सूचक :- गजानन आ पेंढारी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

समन्वय अधिकारी (मलाकल.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- १५३

विषय क्रमांक :- ऐन.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५ (अ) अन्वये महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्य पार पाडणे यां तरतुदीनुसार स्थायी समितीकडे प्रलंबित असणार उपायुक्त (बाधकाम विभाग) यांचं विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील वॉर्ड क्र.८ इदगाहनगर रिक्षा स्टॉप ते चव्हाण पिठाची गिरणी पर्यंतचा रस्ता द.उ.हॉटमिक्स डांबरी करणे एस्टीमेट र.रु.३६,३५,९००/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक बी.बी.गुंजाटे,सांगली यांचेकडून एस्टीमेट दरापेक्षा ५.००% कमी या दराने प्रस्तुतची कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणार खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- BSM

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.सौ.अलका हणमंत पवार यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तस्तुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन महिन्यापासून मराठा-समाजाला आरक्षण मिळणे व कोपर्डी सारख्या घृणास्पद घटना व इतर मागण्यांच्या अनुषंगाने प्रचंड विराट, अतिभव्य मुक मोर्चाचे माध्यमातून तीव्र स्वरुपाचे आंदोलन सुरु आहेत. मराठा समाजाच्या १९४२ पासूनच्या या मागण्या प्रलंबित आहेत. महाराष्ट्रामध्ये बहुतांश मराठा समाज दारिद्र्याचे जीवन जगत असून, मुख्यत: शेतीवर अवलंबून आहे. शेती व शेत मजूरीवरच उदरनिर्वाह करीत असल्याने बहूसंख्य समाज आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने कर्जे बाजारी होवून आत्महत्या करीत आहेत. यासाठी मराठा समाजाला आर्थिक व शैक्षणिक निकष ठरवून आरक्षण देणेस व त्याबाबत शासनास कळविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. किशोर जामदार)

अनुमोदक :- (मा. विजय घाडगे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १५/१०/२०१६

ठराव क्रमांक :- ११७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.सौ.अनारकली जमीर कुरणे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत काम चालू असताना बालहनुमान कॉलनी लगत असणाऱ्या झोपडपट्टी मध्ये रहात असलेल्या काही नागरीकांच्या झोपड्या काढणेत आलेल्या होत्या. सदर नागरीकांना निवाऱ्याची गरज व आवश्यकता असल्याने धोत्रे आबा झोपडपट्टी येथील घरकुल योजनेमध्ये खालील झोपडपट्टी धारकांना लाभ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

१. सुशिला पांडूरंग थोरात

२. बापू रामा शेंडगे

३. सुनिल गंगाधर शेंडगे

४. काशीबाई बाबू माने

५. सुर्यकांत गंगाधर शेंडगे

तसेच, महापालिका क्षेत्रातील संजयनगर पत्राचाळ येथे बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेमधील खालील झोपडपट्टी धारकांना लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. पार्वती यल्लाप्पा कुंचीकोरवी

२. आनंदा शिवा लोंढे

३. पार्वती पांडूरंग वडर

४. यलव्वा काळू पवार

५. बाळासाहेब परशुराम माने

वरील प्रमाणे नमुद असले झोपडपट्टीधारकांना लाभ देणेस प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

नगर अभियंता,
नादानिक

सूचक - (अनारकली कुरणे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महापौर